रविवार, २७ मार्च २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक २४८
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

भिवपुरी रोड येथे मालगाडी बंद पडल्याने प्रवासी वाहतूक ठप्प/२

अर्थविषयक घडामोडींचा वेध घेणारे सदर अर्थ प्रहर/४

पेण संघ ठरला कमळ चषकाचा मानकरी/६

## पीएम गरीब कल्याण अन्न योजनेला मुदतवाढ

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २६) मंत्रिमंडळाची बैठक बोलावली होती.



अशा बैठका साधारणपणे बुधवारी होतात, पण शनिवारी ही बैठक कोणत्या उद्देशाने बोलावण्यात आली याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या बैठकीत एका महत्त्वाच्या मुद्द्यावर निर्णय घेण्यात आला. पीएम गरीब कल्याण अन्न योजनेला पुढील सहा महिन्यांसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. आता ही योजना ३० सप्टेंबरपर्यंत लागू राहील, असा निर्णय मोदी मंत्रिमंडळाने घेतला आहे. ही योजना ३१ मार्चला संपणार होती. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन लागू झाल्यानंतर मोदी सरकारने ही योजना सुरू केली होती. यासाठी सरकारने १.७० कोटी रुपयांची तरतूद केली. या अन्न योजनेंतर्गत गरिबांना प्रतिव्यक्ती पाच किलो धान्य मोफत दिले जाते.

# भाजप नेते किरीट सोमय्यांची दापोलीत धडक

## ■ अनिल परबांच्या बेकायदा रिसॉर्टवरून मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना आव्हान

**दापोली : प्रतिनिधी**

शिवसेना नेते आणि राज्याचे परिवहनमंत्री अनिल परब यांचे बेकायदा रिसॉर्ट तोडण्याच्या मागणीसाठी भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या शनिवारी (दि. २६) कोणत्याही धमक्यांना न घाबरता दापोलीत दाखल झाले. या वेळी माजी खासदार निलेश राणे आणि असंख्य कार्यकर्ते त्यांच्यासोबत होते.

काही पक्षांकडून किरीट सोमय्यांना दापोलीत पाऊल ठेवू देणार नाही, असा इशारा देण्यात आला होता, मात्र मोठ्या ताफ्यानिशी सोमय्या दापोलीत दाखल झाले. या वेळी अनिल परब यांचे अनधिकृत रिसॉर्ट तोडणारच, हिंमत असेल, तर ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वाचवून दाखवावे, असे जाहीर आव्हान सोमय्या यांनी दिले.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना थोड्या स्पष्ट, स्वच्छ, अलंकारिक भाषेत उत्तर देतात, पण मी उद्धव



ठाकरेंना सांगतो की, तुमचा भ्रष्टाचार समोर आल्यावर तुमच्याविरोधात कारवाई केल्याशिवाय थांबणार नाही.

काल आयकर विभागाने एका कंपनीचे आकडे दिले आहेत. त्यात आदित्य, तेजस व रश्मी ठाकरे पार्टनर असलेल्या कंपनीत सात कोटींचे मनी लॉण्डरिंग झाले असून जो नंदकिशोर चतुर्वेदीसोबत उद्धव ठाकरे परिवाराने किती व्यवहार केलाय ना तो सगळा बाहेर काढणार, असेही सोमय्या या वेळी गरजले.

### पोलीस ठाण्यासमोर ठिय्या

भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या आणि निलेश राणे दापोली पोलीस ठाण्यात गेल्यावर त्यांना तेथे तासभर बसवून ठेवण्यात आले, शिवाय पोलिसांनी एफआयआर दाखल करून घेतला नाही. त्यानंतर सोमय्या आणि राणे पोलीस ठाण्यातून बाहेर पडले. त्या वेळी पोलिसांनी भाजप कार्यकर्त्यांच्या गाड्या अडवून धरल्या. त्यामुळे संतापलेल्या सोमय्या आणि राणे यांनी दापोली पोलीस ठाण्यासमोरच ठिय्या दिला. या वेळी सोमय्या यांनी पोलीस आणि शिवसेना मिळून माझ्या हत्येचा कट रचत असल्याचा गंभीर आरोप केला.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

## पळस्पे फाटा येथे जोरदार स्वागत

**पनवेल :** राज्याचे परिवहनमंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांचे अनधिकृत रिसॉर्ट तोडण्यात यावे यासाठी भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या शनिवारी दापोली दौऱ्यावर होते. त्यांचे पनवेलजवळील पळस्पे फाटा येथे भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. या वेळी बोलताना सोमय्या यांनी आमची लढाई राजकीय भ्रष्टाचाराशी आहे. त्यामुळे भ्रष्टाचार केला असेल, तर हिशेब द्यावा लागेल, अशा शब्दांत राज्य सरकारवर निशाणा साधला.

माहितीचा अधिकार आणि विविध तक्रार, अर्जांचा प्रभावी वापर करून राजकीय विरोधकांना जेरीस आणण्याचे काम करणारे भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी शनिवारी दापोलीत धडक दिली. या दौऱ्यादरम्यान त्यांचे पळस्पे फाटा येथे भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रतिकात्मक मोठा हातोडा देऊन स्वागत केले.

सोमय्यांचे स्वागत करतेवेळी भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा नेते योगेश लहाने, अप्पा भागित, ओबीसी सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, दीपक बेहेरे, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, विनोद साबळे, कसळखंड ग्रामपंचायतीचे उपसरपंच महेंद्र गोजे, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, जगदिश घरत, भटक्या विमुक्त जमाती महिला आघाडी जिल्हाध्यक्ष विद्या तामखेडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भ्रष्टाचारावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे -देवेंद्र फडणवीस



**शिर्डी : प्रतिनिधी**

अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारवर अनेक मुद्द्यांवरून टीका केली. यामध्ये मुंबईत महापालिकेकडून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोपदेखील फडणवीसांनी केला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी मात्र केंद्रीय तपास यंत्रणांकडून केल्या जाणाऱ्या कारवायांविषयी भाजपवर टीकास्त्र सोडले. यावरून फडणवीस यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि सत्ताधारी पक्षांवर निशाणा साधला आहे.

शिर्डीत बोलताना फडणवीस म्हणाले की, विधानसभेत आम्ही इतकी भ्रष्टाचाराची प्रकरणे पुराव्यानिशी मांडली. मुंबई महापालिकेत कोविडच्या काळात कशी लूट झाली याची उदाहरणे दिली, मात्र त्याची कुठलीच उत्तरे सत्ताधाऱ्यांकडे आणि मुख्यमंत्र्यांकडे नव्हती. त्यामुळे त्यांनी भावनिक भाषण केले. त्यांची ही जबाबदारी आहे की या भ्रष्टाचाराचे उत्तर त्यांनी दिले पाहिजे.

दरम्यान, कुटुंबीयांवर सुरू असलेल्या कारवाईवरून मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी विधानसभेत बोलताना टीका केली होती. त्यालाही फडणवीसांनी या वेळी प्रत्युत्तर दिले. आम्हाला कुणाच्याही कुटुंबापर्यंत जायचे नाहीये. कोणतीही एजन्सी कोण कुणाचे नातेवाईक आहे हे बघून कारवाई करीत नसते, तर तथ्यांच्या आधारावर कारवाई होत असते, असे फडणवीस म्हणाले.

न्यायव्यवस्थेवर विश्वास नसल्याचे विधान शिवसेना खासदार संजय राऊत यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यावरूनदेखील फडणवीसांनी राऊतांवर निशाणा साधला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी महाराष्ट्र सरकारच्या प्रतिनिधींवर नाराजी व्यक्त केली. त्यांची मते कचऱ्याच्या डब्यात टाकतो असे न्यायमूर्तींनी म्हटलेय. त्यामुळे आपल्या बाजूने निर्णय आला, तर उत्तम आणि विरोधात निर्णय गेला, तर न्यायव्यवस्थेवर विश्वास नाही ही लोकशाहीविरोधी नीती आहे, अशा शब्दांत फडणवीसांनी राऊतांचा समाचार घेतला.

## निवडक

### पारंपरिक औषधांचे पहिले केंद्र गुजरातमध्ये साकारणार

**नवी दिल्ली :** पारंपरिक औषधांवरील संशोधनासाठी जगातील पहिले जागतिक केंद्र गुजरातमधील जामनगर येथे उभारले जाणार आहे. यासाठी आयुष विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्यात शुक्रवारी (दि. २५) जिनिव्हा येथे करार करण्यात आला. या केंद्राचे भूमिपूजन २१ एप्रिल रोजी केले जाणार असून या सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदीही सहभागी होण्याची शक्यता आहे.

### राज्यात सीएनजी-पीएनजी १ एप्रिलपासून होणार स्वस्त

**पुणे :** राज्यातील सीएनजी वाहनधारकांना दिलासा देणारी बातमी आहे.
अर्थसंकल्पात नैसर्गिक वायूवरील कर १० टक्के कमी करण्यात आला आहे. यामुळे १ एप्रिलपासून सीएनजी-पीएनजी स्वस्त होणार आहे. दरम्यान, रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर इंधनाच्या किमती वाढत आहेत. त्यामुळे पेट्रोप, डिझेलचे दर वाढू शकतात.

## मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे जाम



■ टँकर उलटल्याने प्रचंड वाहतूक कोंडी

■ प्रवासी आणि वाहनचालकांचा पाच तास खोळंबा

### ५० पेक्षा अधिक वाहनांचे नुकसान

प्रचंड वाहतूक कोंडी झाल्याने वाहनांच्या क्लच व ब्रेकवर अतिभार पडून किमान ५०हून अधिक वाहनांचे क्लच, ब्रेक निकामी झाले. ही वाहने ऐन कोंडीत घाटातच बंद पडली. त्यामुळे दुहेरी वाहतूक कोंडीची समस्या सोडविताना वाहतूक पोलीस व सामाजिक कार्यकर्त्यांची दमछाक झाली.

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर अमृतांजन ब्रिजजवळ शनिवारी (दि. २६) सकाळच्या सुमारास एक टँकर उलटून त्यातील रसायन रस्त्यावर पसरले. त्यामुळे एक्स्प्रेस वेवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. परिणामी वीकेण्डच्या सुटीसाठी निघालेले पर्यटक तसेच अन्य प्रवाशांचा खोळंबा झाला.


एक्स्प्रेस वेवर सकाळी सहाच्या सुमारास हा अपघात झाला. उलटलेल्या टँकरमधून पडलेले रसायन मेणासारखे वितळून मार्ग निसरडा झाला. यामुळे प्रवासी व वाहनचालकांना बोरघाटात कोंडीचा सामना करावा लागला. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. याची झळ खोपोली, खालापूरपर्यंत पोहचल्याचे चित्र होते.

एक्स्प्रेस वेवरील अपघाताचा फटका जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरून प्रवास करणाऱ्यांनाही बसला. एकवीरा कार्ला गेट ते लोणावळ्यादरम्यान वाहनांची रांग लागली होती. पोलीस व स्थानिक तरुणांनी ग्रिट व माती आणून निसरड्या झालेल्या मार्गावर टाकली. मग तब्बल पाच तासांनंतर वाहतूक हळूहळू सुरू झाली.

## पुणे-बंगळुरू नवा महामार्ग बांधणार

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

**सांगली : प्रतिनिधी**



पुणे ते बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग पावसाळ्यात बंद पडतो. भविष्यात आता या मार्गावर हे संकट येणार नाही. ४० हजार कोटी रुपयांचा पुणे ते बंगळुरू नवा राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे निश्चित केले असल्याची घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी (दि. २६) येथे केली.

सांगली येथील नेमिनाथनगरच्या क्रीडांगणावर आयोजित कार्यक्रमात बोरगाव ते वाटंबरे रस्त्याच्या चौपदरीकरणाचे आणि सांगोला ते जत साखळी मार्गाचे डिजिटल लोकार्पण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. पुणे-बंगळुरू नवा रस्ता पुणे, सातारा, खंडाळा, फलटण, खटाव, खानापूर, तासगाव, कवठेमहांकाळ या दुष्काळी टापूतून जाईल. भविष्यात मुंबई-पुणे रस्ता पुण्याच्या रिंगरोडला जोडल्यानंतर हाच मार्ग मुंबई ते बंगळुरू असा होईल, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास पालकमंत्री जयंत पाटील, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, खासदार संजय पाटील, आमदार सुभाष देशमुख, अनिल बाबर, सुधीर गाडगीळ, सुरेश खाडे, विक्रम सावंत, सदाभाऊ खोत, अरुण लाड, गोपीचंद पडळकर, रणजितसिंह नाईक-निंबाळकर, जयंत आसगावकर, मानसिंगराव नाईक, महापौर दिग्विजय सूर्यवंशी, माजी आमदार विलासराव जगताप, पृथ्वीराज देशमुख, दिनकर पाटील आदी व्यासपीठावर होते.

या वेळी मंत्री गडकरी पुढे म्हणाले की, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचाराने चालणारा महाराष्ट्र देशात अग्रेसर करण्यासाठीचे स्वप्न घेऊन काम करीत आहे. राज्यात पाच लाख कोटी रुपयांची कामे केली आहे. त्यात आधुनिक तंत्राचा वापर करून प्रकल्पांवरील बांधकाम खर्च कमी करणे, इलेक्ट्रिक साधनांचा वापर वाढवणे आणि वेस्ट मटेरियलचा वापर वाढवणे असे धोरण ठेवले आहे.


## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या तुंबई नाटकाला राज्य स्पर्धेत तृतीय पारितोषिक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने राज्य नाट्य स्पर्धेत सादर केलेल्या तुंबई या नाट्यप्रयोगाला शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने तृतीय पारितोषिक जाहीर झाले आहे. याबद्दल ‘तुंबई’च्या संपूर्ण चमूचे अभिनंदन होत आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ




ठाकूर, अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व उपाध्यक्ष तथा महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांचे मार्गदर्शन कला क्षेत्राला सातत्याने मिळत असते. त्या अनुषंगाने तुंबई या नाटकाचे सादरीकरण राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित ६०व्या राज्य नाट्य स्पर्धेतील प्राथमिक फेरीत झाले होते. ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात झालेल्या या प्रयोगास रसिकांनी दाद दिली.

‘तुंबई’चे लेखक चैतन्य सरदेशपांडे, दिग्दर्शक गणेश जगताप असून प्रकाश योजना श्याम चव्हाण यांची, नेपथ्य व संगीत कलादर्पण संस्थेचे, गीत गणेश जगताप, सूत्रधार अभिषेक पटवर्धन, तर रंगमंच व्यवस्था टीम अटल करंडकने पाहिली. अभिजित झुंजारराव व प्रफुल गुरव यांचे सहकार्य लाभले. या नाट्यप्रयोगास तृतीय क्रमांक प्राप्त झाल्याने सर्वांचे अभिनंदन होत आहे.

## आयपीएल ‘रन’संग्राम सुरू



**मुंबई : आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगच्या १५व्या हंगामाला शनिवारी प्रारंभ झाला. गतविजेता चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट रायडर्स या संघांमध्ये सलामीची लढत रंगली.**

## खालापुरात आज भव्य सामुदायिक विवाह सोहळा

**खालापूर : रामप्रहर वृत्त**



वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र आणि केप्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २७) खालापूर तालुक्यातील वाशिवली वाडी साई नगर येथे दुपारी १२ वाजता जनजाती समाजातील ७५ जोडप्यांचा भव्य सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, पेणचे आमदार रविशेठ पाटील, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, कॅप्री ग्लोबल कॅपिटल लि.चे एमडी राजेश शर्मा, विश्वस्त बेनी प्रसाद राऊका, सीएसआर नीता जोशी, राहूल रसाळ, जि.प.च्या माजी सदस्य पद्मा पाटील, पं. स. सदस्य चंद्रकांत कातकरी, वडगाव-वाशिवली ग्रामपंचायतीच्या सरपंच गौरी गडगे, उपसरपंच सुजाता पाटील, सदस्य उपस्थित राहणार आहेत.

या वेळी वधू-वरांस शुभाशीर्वाद देण्यासाठी आपण सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन वनवासी कल्याण आश्रमाच्या कोकण प्रांत अध्यक्ष ठमाताई पवार यांनी केले आहे.

# भाजप नेते किरीट सोमय्या यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत

## ठाकरे सरकारमधील 'डर्टी डझन'विरुद्ध कारवाई करावीच लागेल –सोमय्या

**परिवहन मंत्री अनिल परब यांच्या रत्नागिरी जिल्ह्यातील दोपोली येथील अनधिकृत रिसॉर्टवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या हे शनिवारी (दि. २६) दापोली निघाले होते. त्या वेळी त्यांचे ठिकठिकाणी भाजप कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी किरीट सोमय्या यांनी राज्य सरकारवरही निशाणा साधाला.**

### सोमय्यांच्या दौऱ्याकडे शिवसेनेचे दुर्लक्ष

*दापोलीकडे चाललेला भाजप नेते किरीट सोमय्या यांचा दौरा महाड, पोलादपूरमध्ये येऊनही स्थानिक शिवसेना नेतृत्वाकडून या दौऱ्याचा कुठेही निषेध करण्यात आला नाही. त्यामुळे याबाबत राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे, तर भविष्यातील होणाऱ्या घडामोडींबाबत सेनेकडून ही सावध भूमिका आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.*









(छाया : शैलेश पालकर, महेश शिंदे, जितेंद्र जाधव)

**पोलादपूर, महाड, धाटाव : प्रतिनिधी**

घोटाळे, मनीलॉण्ड्रिंग केलेल्या ठाकरेंच्या सरकारमधील 'डर्टी डझन' यांच्याविरूद्ध कारवाई करावीच लागेल, असा घणाघात किरीट सोमय्या यांनी पोलादपूर शहरात केला.

पोलादपूर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून किरीट सोमय्या यांनी जनतेशी संवाद साधला. यावेळी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष ॲड. महेश मोहिते, बिपीन म्हामूणकर, संदीप ठोंबरे, राजन धुमाळ, पोलादपूर तालुका अध्यक्ष प्रसन्न पालांडे, नगरसेविका अंकिता जांभळेकर निकम, महेश निकम, समीर सुतार, एकनाथ कासुर्डे, शहराध्यक्ष राजा दिक्षित, निलेश आंबेतकर, रश्मी दिक्षित, रचना धुमाळ, समाधान शेठ, निलेश चिकणे, पंकज बुटाला, भाई जगताप, मंगेश शिंदे, महिला मोर्चाच्या कालिका अधिकारी, योगिता भागवत, तनुजा भागवत, उज्ज्वला शेठ, विशाखा आंबेतकर




यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

आम्ही हातोडा घेऊन परिवहन मंत्री अनिल परब यांचा निषेध करणार आहोत. त्यांच्याविरूद्ध कारवाई होणार, आता फक्त मुख्यमंत्र्यांच्या मेव्हण्याची संपत्ती उघडकीस आली आहे, सोमय्या यांनी सांगितले. तत्पूर्वी किरीट सोमय्या यांच्या मोटारींचा ताफा पोलादपूर येथे थांबताच येथील महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी 'लढते रहो लढते रहो! किरीट सोमय्या लढते रहो!' अशा घोषणा दिल्या. किरीट सोमय्या यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते येणार असल्याने स्थानिक पोलिसांनीही ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

महाड येथील विसावा हॉटेल येथेही किरीट सोमय्या यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष महेश मोहिते, जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी यांच्यासह कार्यकर्ते व महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. महाड व पोलादपूर तालुक्यात त्यांचे आगमन झाल्यानंतरही स्थानिक पातळीवर शत्रुपक्ष असणाऱ्या शिवसनेनेतर्फे फारसा विरोध झाला नसल्याचे या वेळी दिसून आले. त्यामुळे शिवसेने आपली सावध भूमिका यावरून स्पष्ट केली का, अशी चर्चा या वेळी राजकीय वर्तुळात रंगली होती.

दरम्यान किल्ले रायगड परिसरातील जो जमीन संपादित करण्याचा घाट राज्य सरकारकडून घातला जात आहे, त्याबाबत चौकशी व्हावी व ही संपादन प्रक्रिया स्थगित करावी, अशी मागणी महाड भाजपच्या वतीने करण्यात आली. याबाबत भाजपचे तालुका सरचिटणीस महेश शिंदे, ओबीसी सेलचे अध्यक्ष अजित अवकीरकर, उपतालुकाध्यक्ष चंद्रजित पालांडे यांनी एक निवेदन त्यांना सादर केले.

मुंबई–गोवा महामार्गावरील कोलाड नाक्यावरही शनिवारी सकाळी ११ वाजता असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत करून 'किरीट भाई तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, अनिल परब यांचा रिसॉर्ट तोडलेच पाहिजे', अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. या वेळी दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग, रोहा नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते संजय कोनकर, भाजपा सरपंच रघुनाथ कोस्तेकर, किसान युवा मोर्चाचे अध्यक्ष निमिश वाघमारे, भाजपा विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, नरेश कोकरे, महिला जिल्हा अध्यक्ष हेमा मानकर, सरचिटणीस यांच्यासह श्रद्धा घाग यांसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माधुरी पाटील आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित

**पनवेल : प्रतिनिधी**

आपला सरपंच आपला गौरव ग्रामपंचायतीच्या विकासात नवराष्ट्रची साथ या कार्यक्रमातंर्गत सरपंच सम्राट पुरस्कार वितरण कार्यक्रम शनिवारी (दि. २६) अलिबाग येथे झाला. या वेळी पनवेल तालुक्यातील कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच माधुरी अनिल पाटील यांनी कळसखंड ग्रामपंचायतीमध्ये विविध आदर्शवत कामे करीत गावाचा विकास साधला आहे.

त्याचबरोबर कोरोना काळात जनजागृती, अन्नधान्य वाटप, लसीकरण मोहीम राबवून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना आदर्श सरपंच पुरस्काराने गौरविण्यात आले.

## खालापुरात ८० हजारांचा गांजा जप्त; एकाला अटक

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग रायगड पथकाने खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारावर शुक्रवारी (दि. २५) गांजा विक्री करणाऱ्या हमजा निजामुद्दीन खोपोलीवाला, (वय ३२ रा. आशियाना बिल्डींग, खोपोली बाजारपेठ) याला रंगेहाथ अटक केली. त्याच्याकडून सुमारे सहा किलो वजनाचा ७६ हजार ७०० रुपये किंमतीचा गांजा जप्त करण्यात आला आहे.

पथकातील पोलीस हवालदार राजेश पाटील यांना खोपोलीतील मूळगावच्या हद्दीत एक जण कारमधून गांजा विक्रीसाठी घेऊन



येणार असल्याची माहिती खबऱ्यामार्फत मिळाली होती. त्याप्रमाणे शुक्रवारी सहाय्यक पोलीस निरीक्षक पवनकुमार ठाकूर, सहाय्यक फौजदार देवराम कोरम, पोलीस हवलदार राजेश पाटील, अमोल हंबीर, प्रशांत दबडे, विकास खैरनार यांचे पथक दबा धरून बसले होते. आरोपी हमजा निजामुद्दीन खोपोलीवाला त्याच्या कारसह घटनास्थळी आल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. गाडीमध्ये ६.३९४ किलो ग्रॅम वजनाचा गांजा सापडला. चौकशीमध्ये हमजाने गांजा स्थानिक पातळीवर विक्री करण्यासाठी आणला असल्याची प्राथमिक माहिती दिली. हमजा याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मालगाडी बंद पडल्याने प्रवासी वाहतूक दीड तास ठप्प

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या पुणे–मुंबई मार्गावर कर्जत आणि भिवपुरी रोड या दोन रेल्वे स्थानकादरम्यान शनिवारी (दि. २६) इंजिनमधील बिघाडामुळे मालवाहू गाडी बंद पडली. त्यामुळे दीड तास प्रवासी वाहतूक ठप्प झाल्याने प्रवाशांचे हाल झाले. फाटकही बंद करण्यात आल्याने वाहतूक कोंडी झाली होती.

कर्जत ते भिवपुरी रोड रेल्वेस्थानकादरम्यान शनिवारी दुपारी मेन लाईनवरून जाणाऱ्या मालवाहू गाडीच्या इंजिनात बिघाड झाल्यामुळे थांबली. त्यामुळे कर्जत येथून मुंबई सीएसएमटीकडे जाणारी उपनगरीय प्रवासी वाहतूक ठप्प झाली. तब्बल दीड तासाने ही वाहतूक सुरळीत करण्यात आली. मालवाहू गाडीच्या मागे खोपोली येथून मुंबईकडे जाणारी लोकलही थांबली होती. तर मुंबईकडे जाणाऱ्या अन्य दोन लोकल गाड्या कर्जत स्थानकात थांबवून ठेवण्यात आल्या होत्या. पुणे येथून गुजरातकडे जाणारी एक एक्सप्रेसही कर्जत स्थानकात सुमारे पाऊण तास थांबवून ठेवण्यात आली होती.

### भिवपुरी रेल्वेफाटकही बंद केल्याने वाहतूक कोंडी

***या मालवाहू गाडीच्या बिघाडामुळे चिंचवली गावाच्या बाहेर असलेले रेल्वेफाटक बंद करण्यात आले. हे फाटक बंद केल्याने वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहनचालकांना नेरळ किंवा कर्जत येथून कडाव भागात जाण्याची वेळ आली.***

## संजय राऊतांचे मानसिक संतुलन बिघडलेय!

### ▪ सर्वोच्च न्यायालयासंदर्भातील वक्तव्यावरून चित्रा वाघ यांनी साधला निशाणा

**मुंबई : प्रतिनिधी**

दिल्लीच्या हातातील न्यायाचा तराजू हा खरा नसून चोर बाजारातील आहे हे उघड झाले, अशी टीका अग्रलेखामधून शिवसेनेने केली आहे. हा न्यायालयाचा अपमान असून यामुळे संजय राऊत यांचे मानसिक संतुलन बिघडतेय असे दिसते, अशी टीका भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केली.



सर्वोच्च न्यायालयाने मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्याविरोधात दाखल झालेले सर्व खटले सीबीआयकडे वर्ग करण्याच्यावरून संजय राऊत यांनी टीका केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना फटकारले असता शिवसेना आक्रमक झाली. मात्र आता यावरून भाजपच्या प्रदेश उपाध्यक्ष चित्रा वाघ यांनी, राऊत यांचं मानसिक संतुलन बिघडल्याचा टोला लगावला.

शिवसेनेने, न्यायाचा तराजू हलतो आहे व सत्याची गळचेपी सुरू आहे. अशा वेळी न्यायालयांनी जनतेचा आवाज बनायला हवे. विशिष्ट विचारधारेच्या परिवाराचा 'गुलाम' किंवा 'प्रचारक' म्हणून केंद्रीय तपास यंत्रणा व न्यायालयास स्वतःला जुंपून घेता येणार नाही. भारतीय घटना त्यांना तशी मान्यता देत नाही, पण आज हे सगळेच लोक अंधभक्तीचा सूर आळवीत आहेत, अशा कठोर शब्दांमध्ये टीका केली.

याच पार्श्वभूमीवर चित्रा वाघ यांनी, न्यायाचा तराजू म्हणजे चोर बाजारातून विकत आणल्याचे वक्तव्य शिवसेनेचे सर्वज्ञानी संजय राऊत यांनी केले. त्यांचं मानसिक संतुलन बिघडल्याचं लक्षण आहे. याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मी मागणी त्यांनी केली.

## उरणमधील शिव-समर्थ स्मारक लवकरच होणार खुले

**उरण : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांच्या पुढाकाराने उरण–पनवेल मार्गावर जासई दास्तान फाटा येथे जेएनपीटीने ३२ कोटी खर्चून उभारलेले भव्य शिव–समर्थ स्मारक नागरिकांसाठी १० दिवसांनंतर खुले करण्यात येणार आहे. जेएनपीटीचे वरिष्ठ प्रबंधक तथा सचिव जयंत ढवळे यांनी ही माहिती दिली.

जासई–दास्तानफाटा दरम्यान जेएनपीटी प्रशासनाने ३२ कोटी खर्चून १९.३ मीटर उंचीचे भव्य शिव–समर्थ स्मारक नऊ हजार चौरस मीटर क्षेत्रात उभारण्यात आले आहे. स्मारकाच्या तळमजल्यावर ४८० चौरस मीटरचे भव्य बहुउद्देशीय सभागृह आहे. या सभागृहात कॅन्टीन, ग्रीनरुम आणि संग्रहालय



उभारण्यात आले आहे. या संग्रहालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. पहिल्या मजल्यावर दोन खुल्या बाल्कनी आहे. दुसऱ्या मजल्यावरील एक्झिबिशन हॉलमध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित ऐतिहासिक चित्र, शिल्प लावण्यात

> **कोविड दरम्यान मागील दोन वर्षांपासून राज्यभरातील अनेक संग्रहालये बंद ठेवण्यात आली होती. आता मात्र बंदीचे निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटकांकडून नाममात्र प्रवेश फी आकारणी करीत हे शिवस्मारक येत्या दहा दिवसातच पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार आहे.**
> **–जयंत ढवळे, वरिष्ठ प्रबंधक तथा सचिव, जेएनपीटी**

आले आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या शिक्षेच्या प्रसंगाचेही अप्रतिम शिल्प उभारण्यात आले आहे. त्यानंतर तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर व्ह्यूज गॅलरी आणि महाराजांच्या जीवनपटावर ऑडिओ व्हिज्युअल सिस्टीमची व्यवस्था करण्यात आली आहे. स्टेजच्याच मागे ॲम्फी थिएटर उभारण्यात आले आहे. पाचव्या मजल्यावर सहा मीटर उंचीचा छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि चार मीटर उंचीचा समर्थ रामदास स्वामी यांचा अष्टधातुंचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात आला आहे. राज्यातील इतक्या मोठ्या उंचीचे हे एकमेव स्मारक आहे.

१७ फेब्रुवारी २०१९ रोजी या शिव–समर्थ स्मारकाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते, मात्र कोरोनामुळे हे शिवस्मारक मागील दोन वर्षे बंद ठेवण्यात आले होते. आता १० दिवसांनी हे स्मारक नागरिकांसाठी खुले होणार आहे.


**अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण उरण यांचे न्यायालयांत**

(Tenancy Mannual, Form VIII)

कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यांचे कलम ३२ पोट कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस

**कुळ कायदा कलम ३२ग प्रमाणे दावा क्र.१/२०२२**

श्रीम. कुंदाबाई गजानन मोकल उर्फ
सौ. कुंदा कृष्णा पाटील
रा. कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड — **अर्जदार**

**विरूद्ध**

१. श्री. गजानन विष्णू पोवळे
२. श्री. रामचंद्र विष्णू पोवळे
रा. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड — **सामनेवाले**

**जमिनीचे वर्णन**

| अ.क्र. | गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | चिरनेर | ७१/४/अ | ०.५२.५०<br>०.०५.१० | ०.६२ |

ज्याअर्थी **जिल्हा रायगड, तालुका–उरण, गांव–चिरनेर** यातील वर निदिष्ट केलेल्या जमिनी...
...तुम्ही

हे कृषीदिन कुळ म्हणून करीत असल्याकारणाने त्या मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ यांच्या ३२ग त्यांनी खरेदी केल्या आहेत असे समजण्यांत येण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी आता तुम्हांस नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास **ता. ८/४/२०२२, रोजी दु. ३–०० वाजता तहसिल कार्यालय उरण** येथे शेतजमीन न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्हास न्यायाधिकरण यावरून फर्मावित आहे. जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्याबाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहित धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामात तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल.

**दिनांक :– २५/३/२०२२**
**ठिकाण :– उरण**

**सही/–**
**अप्पर तहसिलदार तथा**
**शेतजमीन न्यायाधिकरण उरण**

# उरण ग्रामीण रुग्णालयाला गैरसोयींनी ग्रासले

## ▪ कर्मचाऱ्यांची वानवा; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

**उरण : वार्ताहर**

उरणमधील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाला सध्या गैरसोयींनी ग्रासले आहे. या ठिकाणी कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

वाढत्या औद्योगिक पसाऱ्यामुळे तिसरी मुंबई म्हणून उरणकडे पाहिले जाते. उरणच्या शहरी व ग्रामीण जनतेसाठी ३० खाटांचे शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आले आहे. कोरोना महामारीपूर्वी येथे दररोज उपचारासाठी येणाऱ्या बाह्यरुग्णांची संख्या २२५ ते २५० पर्यंत होती. दोन वर्षे कोरोना काळात ५०-७५ पर्यंत तर कोरोना निर्बंध शिथिलतेनंतर आता बाह्यरुग्णांची संख्या १२५-१५० पर्यंत घसरली आहे.

प्रसुतीसाठी दाखल होणाऱ्या महिलांची संख्या १५ वर येऊन ठेपली आहे. सिंझरिंग व अडचणीच्या ठरणाऱ्या केसेस उपचारासाठी पनवेल, नवीमुंबई, मुंबईकडे पाठविण्यात येतात. आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे, अशा गरीब गरजूसाठी खासगी रुग्णालय अथवा बाहेर जाऊन उपचार करून घेणे आवाक्याबाहेर आणि कठीण ठरते.



रुग्णालयासाठी वैद्यकीय अधीक्षक एक, वैद्यकीय अधिकारी तीन अशी एकूण चार पदे मंजूर आहेत. मात्र मागील २७ वर्षांत २०१२-१३ सालातील एक-दोन वर्षांचा कालावधी वगळता अद्यापही वैद्यकीय अधीक्षक पदावर कायमस्वरूपी अधिकारी नियुक्त करण्यात आलेले नाही. क्लास-४ पदाच्या सात मंजूर जागांपैकी अद्यापही तीन जागा रिक्त आहेत. स्त्रीरोग तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ नसल्याने शस्त्रक्रिया विशेषतः प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांवर उपचार करणे अवघड होऊन बसते. सोनोग्राफी, ईसीजीअभावी रुग्णांवर उपचार करणे जीकिरीचे झाले आहे.

अपघातग्रस्त रुग्णही मोठ्या प्रमाणात उपचारासाठी दाखल केले जात असल्याने इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयावर त्याचा ताण वाढत आहे. त्यामुळे रुग्णालयातील गैरसोयींचा सर्वाधिक फटका गरीब-गरजू रुग्णांना बसत आहे. प्रभारी पदावरील वैद्यकीय अधिक्षकांना रुग्णांवर उपचार करून घेण्याऐवजी मुंबई, ठाणे, अलिबाग येथील आरोग्य विभागाच्या विविध बैठकांना उपस्थित राहावे लागते. तसेच रुग्ण तपासणीपेक्षा कार्यालयीन कामकाजासाठी अधिक प्राधान्य द्यावे लागते. त्यामुळे बाह्यरुग्णांचा भार उर्वरित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर पडत आहे.

उरण तालुक्यात आरोग्यसेवेसाठी केवळ एक शासकीय रुग्णालय तर एक प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. उर्वरित प्राथमिक केंद्र मंजुरीनंतरही अद्यापही कागदावरच आहेत. १०५ कोटी खर्चाचे १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आठ वर्षांनंतरही उभारणीच्या प्रतिक्षेत आहे.

> **गरीब-गरजू रुग्णांवर तातडीने आणि योग्य प्रकारे उपचार करून देण्यासाठी रुग्णालयातील रिक्त पदे तत्काळ भरण्याची आवश्यकता आहे. यासाठी रुग्णालयाकडून मागील अनेक वर्षांपासून मागणी केली जात आहे. कोरोनाचे निर्बंध उठविण्यात आल्यानंतर बाह्यरुग्णांची संख्या आता वाढली आहे.**
> **-गौतम देसाई, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय**

## निवडक




### नृत्य आणि आयकॉनिक स्पर्धा

**पनवेल** : प्रयास एंटरटेनमेंट पेसीक प्रा. लि. तर्फे १४ ते १७ एप्रिल या कालावधीत पणजी, गोवा येथे ८ वी अखिल भारतीय नृत्य आणि आंतरराष्ट्रीय आयकॉनिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अविनाश बडगे आणि सुष्मिता बडगे आहेत. अभिनेत्री सुधा चंद्रन, शुभ मल्होत्रा, संजीव सिंग, पल्लव ओझा, ट्विंकल कपूर, नसरीन पूनावाला या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून दीपक भोला यांनी यासाठी व्यवस्थापन केले. प्रयास एंटरटेनमेंटतर्फे ३० कलाकारांना शिष्यवृत्ती आणि व्यासपीठ देत आहे. न्यूटन डायस, शोचे संचालक यश शेलार, प्रॉडक्शन मिलिंद राणे, शो ऑपरेटर जॅझ, आशिर पाचोरी मुख्य समन्वयक महेश सेठी क्रिएटिव्ह टीम सूरज कुटे (त्रैलोक्य व्यवस्थापन सेवा), अनिरुद्ध आदींचा सहभाग असणार आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप तसेच इतर स्पर्धेतील स्पर्धकांना रोख रक्कम बक्षिसरुपी दिली जाणार आहे.

### श्री साईबाबा मंदिरात श्रीराम कथा

**पनवेल** : श्री साई नारायण बाबा यांच्या आशीर्वादाने पनवेल येथील श्री साई बाबा मंदिर येथे श्री रामनवमी उत्सवाचे औचित्य साधून प्रथमच श्रीराम कथेचे आयोजन २ ते १० एप्रिलदरम्यान होणार आहे. श्री रामकथा पुज्य श्री दिव्यांशु महाराज-अयोध्या हे कथा सादर करणार आहेत. यानिमित्त यज्ञ व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री साई नारायण बाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थानचे चेअरमन खेमचंद गोपलानी, को-ऑर्डिनेटर रामथदानी व सचिव रामलाल चौधरी यांनी दिली आहे. सर्व भाविकांनी या श्री रामकथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### अज्ञात कारणावरून आत्महत्या

**पनवेल** : अज्ञात कारणावरून एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल परिसरात घडली आहे. शिवा नावाच्या व्यक्तीने अज्ञात कारणावरून उलवे सेक्टर २५, प्लॉट नं.४८१ येथील साईटच्या पत्र्याच्या शेडमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. त्याचे अंदाजे वय ५० ते ५५ वर्षे, उंची ५ फुट १ इंच, डोक्यावरील केस काळे असून या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खारघरमध्ये क्रेडिट कार्डधारकाला गंडा; खात्यातून एक लाखांची खरेदी

**पनवेल : वार्ताहर**

एसबीआय बँकेतून बोलत असल्याचे भासवून एका सायबर चोरट्याने गोवंडी येथे राहणाऱ्या व्यक्तीला बोलण्यात गुंतवून त्याच्या क्रेडिट कार्डमधून एक लाख रुपयांची खरेदी करून फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील अनोळखी सायबर चोरट्याविरोधात फसवणुकीसह आयटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव मनोज राठोड असे असून ते गोंवडी येथे राहण्यास आहेत. एसबीआय बँकेच्या प्रतिनिधीने मनोज यांना संपर्क साधून त्याच्या क्रेडीट कार्डवरून झालेल्या १ लाख रुपयांच्या व्यवहाराबाबत त्यांच्याकडे विचारणा केली. मनोजने कुठल्याही प्रकारची खरेदी केली नसल्याचे सांगून हा व्यवहार रद्द करण्यास सांगितले. मात्र तोपर्यंत व्यवहार पूर्ण झाल्याने मनोजच्या क्रेडिट कार्डमधून १ लाख रुपये गेल्याचा मेसेज त्यांना प्राप्त झाला. त्यानंतर मनोजने आपले क्रेडिट कार्ड ब्लॉक करून खारघर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

# एजेएफसी पत्रकार संघटनेचे पुरस्कार जाहीर

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय पत्रकार मित्रांची संघटना असलेल्या ऑल जर्नालिस्ट अॅड फ्रेंडस सर्कल संघटनेच्यावतीने राज्यात पत्रकारितेमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना पुरस्कार जाहीर झाले.

मुंबई येथे होणाऱ्या पत्रकार मित्र सन्मान सोहळ्यामध्ये पनवेल येथील ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी यांना जीवन गौरव पुरस्कार, सावंतवाडी येथील अभिमन्यू लोंढे यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर स्मृती दर्पण पुरस्कार, कराड येथील अतुल होनकळसे यांना नानासाहेब जोशी संपादक पुरस्कार, अकोट येथील राहुल कुलट यांना मधुकर लोंढे पत्रकार स्मृती राज्य पुरस्कार, रत्नागिरीच्या संगमेश्वर येथील युयुस आर्ते यांना शरददादा बोरकर सामाजिक कार्यकर्ता राज्य पुरस्कार, बार्शी येथील गणेश गोडसे यांना नवीनचंद्र सोष्टे आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर झाले आहेत.

विविध मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी (दि. २७) सायंकाळी ५ वाजता रिजॉईस इंटरनॅशनल स्कूल, मालाड, मुंबई येथे हा सन्मान सोहळा होणार असल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले.





# नगरसेवक विक्रांत पाटील यांनी केली प्रभागातील विकासकामांची पाहणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक तसेच भाजप युवामोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी प्रभागातील विविध विकासकामांची पाहणी करून आवश्यक त्या सूचना संबंधित कंत्राटदारांना व महापालिकेच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

प्रभागातील अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे, नळजोडणी, पेव्हरब्लॉक आदी कामे सुरू आहेत. ही कामे सुयोग्य पद्धतीने होतात की नाही याची पाहणी विक्रांत बाळासाहेब पाटील यांनी केली.

या वेळी त्या विभागातील नागरिकांशीही चर्चा केली. त्यांना येत असलेल्या अडीअडचणी जाणून घेतल्या व या संदर्भात संबंधित कंत्राटदारांना व महापालिकेच्या अधिकाऱ्यांना तशा सूचना केल्या.

ही कामे पूर्णत्वास नेत असल्याने प्रभागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

(छाया : नितीन देशमुख)

# नवीन पनवेलच्या भुयारी मार्गातील नालासफाईला सुरुवात

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधून पनवेल (तक्का) मध्ये जाण्यासाठी रेल्वेने बांधलेल्या भुयारी मार्गात पाणी साचत असल्याने या पाण्यातून वाहनचालकांना गाडी हाकावी लागत आहे. तसेच अनेक वेळा दुचाकी घसरून अपघात होत आहेत. याबद्दल नगरसेवक मनोज भुजबळ यांनी सिडकोकडे तक्रार केल्यानंतर अखेर नाल्यात अडकलेला गाळ हाताने काढण्यास सुरुवात झाली आहे.

गाढी नदीच्या काठावर हा भुयारी मार्ग १० कोटींपेक्षा जास्त रुपये खर्च करून बांधण्यात आला आहे. यामध्ये सिमेंटचे चार ब्लॉक तयार करून बसवण्यात आले आहेत. या मार्गाच्या दोन्ही बाजूला ब्लॉक संपतात त्या ठिकाणी मार्गातील पाणी जाण्यासाठी नाला ठेवण्यात आला आहे. या नाल्याची उंची ही आतील सिमेंट ब्लॉकपेक्षा जास्त असल्याने आत साचलेले पाणी तसेच राहत आहे. याशिवाय त्याठिकाणी वाहून येणारी माती नदीच्या पात्रात न जाता तेथील दुभाजकाजवळील जाळीला अडकून राहून नाला मातीने भरून जातो. त्यामुळे वरून येणारे पाणी ब्लॉकमध्ये जाते. नाल्यातील माती काढण्यासाठी बसवलेली जाळी काढण्याची सोय नाही. त्यामुळे अखेर लोखंडी जाळीत हात घालून माती काढण्यात येत आहे. हात जाळीतून आत जात नसल्याने पूर्ण माती काढणे शक्य नाही. त्यामुळे चार-पाच दिवसांनी पुन्हा तो नाला भरणार आणि पाणी ब्लॉकमध्ये जाऊन वाहनचालकांना त्रास होणार आहे. यावर कायमस्वरूपी उपाय करणे गरजेचे असून सिडको आणि रेल्वेने लक्ष देणे गरजेचे असल्याचे नगरसेवक मनोज भुजबळ यांनी सांगितले.

> **भुयारी मार्गाच्या नाल्यात बसवलेली जाळी फिक्स आहे. ती जर काढण्याची सोय असती तर नाला साफ करणे सोयीचे झाले असते. आम्ही दोनदा हाताने साफ करून घेतले. पण आठ दिवसांत पुन्हा भरते. रेल्वेने ती जाळी काढता येणारी बसवल्यास हा प्रश्न सुटेल.**
> **-संतोष साळी, एईई, सिडको**



# आयपीएलसाठी वाहतूक पोलिसांचा कडक बंदोबस्त

## ▪ सामन्यांच्या दिवशी मैदानालगतचा रस्ता इतर वाहनांसाठी बंद



(प्रातिनिधीक छायाचित्र)

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील मैदानात आयपीएलचे क्रिकेट सामने होत असून या दिवशी वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने इतर वाहनांची वाहतूक वळविण्यात आली आहे. तसेच या वर्षी प्रथमच पार्किंगसाठी 'क्यूआर कोड'ची सुविधा देण्यात आली आहे.

तिकिटावरील कोड स्कॅन करून आपली पार्किंग कुठे आहे हे शोधता येणार आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होणार नाही असे वाहतूक पोलिसांनी सांगितले. ठाणे-बेलापूर मार्गालगत या मैदानाची दोन प्रवेशद्वारे आहेत. शिवाय पार्किंगसाठीचे प्रवेशद्वारही येथेच आहे. त्यामुळे परिस्थितीनुसार हा रस्ता अन्य वाहनांसाठी बंद ठेवण्यात येईल व ही वाहतूक ठाणे-बेलापूर आणि नेरुळमधील अंतर्गत रस्त्यांवरून वळवण्यात येणार आहे. आयपीएलमधील २० सामने हे डॉ. डी. वाय. पाटील मैदानात होणार आहेत. यातील चार सामने दिवसा तर १६ सामने दिवस-रात्र असणार आहेत.

या मैदानात ५५ ते ६० हजार इतकी प्रेक्षक क्षमता असून दीड ते पावणेदोन हजार वाहनांचा अंदाज आहे. डॉ. डी. वाय. पाटील प्रशासनाच्या वाहनतळाची क्षमता केवळ ५०० वाहनांची आहे. हे वाहनतळ केवळ महत्त्वाच्या व्यक्तींसाठी आरक्षित असणार आहे. त्यामुळे इतर प्रेक्षकांसाठी नेरुळ सेक्टर १९ येथील भीमाशंकर मैदान आणि रहेजा मैदानात वाहनतळ करण्यात आले आहे.

### ▪ अतिरिक्त पोलीस दलही तैनात

***नवी मुंबईतील २० सामने शिस्तीत पार पडावेत यासाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यासाठी महासंचालकांकडून अतिरिक्त कुमकही देण्यात येणार आहे. याशिवाय २००पेक्षा अधिक खासगी सुरक्षारक्षक असणार आहेत. डॉ. डी. वाय. पाटील मैदान प्रशासनाचे ४०० सुरक्षारक्षक असणार आहेत. तीन पोलीस आयुक्त, १२ साहाय्यक पोलीस आयुक्त, ४५ पोलीस निरीक्षक, १२० पोलीस उपनिरीक्षक, १२०० पोलीस कर्मचारी ज्यात २०० महिला कर्मचारी असा १३०० पेक्षा अधिक जणांचा बंदोबस्त असणार आहे. याशिवाय राखीव पोलीस बळ, जलद गती पथक, दंगलविरोधी पथक तैनात असणार आहे. याशिवाय या मार्गावर अतिरिक्त सीसीटीव्ही लावण्यात येणार आहेत.***

# युईएस कॉलेजमध्ये तरंग फेस्टिवल उत्साहात

**उरण : वार्ताहर**

युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड टेक्नोलॉजीमध्ये तरंग फेस्टिवल उत्साहात साजरा झाला. दोन दिवस झालेल्या या सोहळ्यात विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. डुडल मेकिंग, नेल आर्टस्, क्विझ, स्पॉट फोटोग्राफी, टॅटू, नॉन फ्राय कुकिंग, डिबेट, ट्रेजर हण्ट इत्यादी रंगीबेरंगी खेळांची व स्पर्धांची रेलचेल होती.




या वर्षीही विद्यार्थ्यांसाठी उद्योजक मेळावा भरवण्यात आला होता. या मेळाव्यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध वस्तूंची विक्री करून कुशल उद्योजक होण्याचे धडे घेतले. फेस्टिवलच्या समारोपाच्या दिवशी म्हणजेच शुक्रवारी (दि. २५) रोजी सरस्वती मंडपात सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम आनंदात पार पडला.

युईएस. संस्थेचे ट्रस्टी मेंबर्स, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजचे एचओडी तसेच पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक विभागातील सुपरवायझर्स यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये भाग घेतला, तर काही मुलामुलींनी रॅम्प वॉक करून उपस्थितांची मने जिंकली. वर्षभर आयोजित केलेल्या कॉलेजमधील विविध स्पर्धांमध्ये तसेच तरंग फेस्टिवलमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.


# स्वाभिमानी रिपब्लिकनतर्फे विविध कार्यक्रम



**पनवेल : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याकरिता स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची बैठक नुकतीच पार पडली. रिपब्लिकन नेते भाई संगारे यांचा स्मृतीदिन १ एप्रिल रोजी, ८ एप्रिल रोजी पक्षाचे प्रमुख मनोज संसारे यांचा वाढदिवस, १० एप्रिल रोजी महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम, कोरोना काळात निधन झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रम होणार आहे. १४ एप्रिल रोजी वडाळा ते दादर चैत्यभूमी अशी भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या बैठकीला जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्यासह बाळाराम जाधव, विजय धोत्रे, सागर संसारे, महिला आघाडी, युवा आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘ब्लॉकबस्टर’ भारतीय निर्यातवाढीचे विविध पैलू




आधीच दोन वर्षे मुक्काम ठोकलेल्या कोरोनाचा फटका बसलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेला रशिया-युक्रेन युद्धाने आणखी चिंतेत टाकले आहे. भारतही त्याला अपवाद नाही, मात्र याच काळात म्हणजे गेल्या एका वर्षात भारताने निर्यातीत मोठीच मजल मारली आहे. हे आर्थिक वर्ष संपण्यास नऊ दिवस शिल्लक असताना आपण ४०० अब्ज डॉलरचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य केले असून ३१ मार्चपर्यंत हा आकडा ४१० अब्ज डॉलरवर जाईल, असा अंदाज आहे. कोरोनापूर्वीच्या वर्षांत भारताची निर्यात ३३१ अब्ज डॉलर इतकी होती. निर्यातीत अशी भरीव वाढ प्रथमच होत असून आयात निर्यात व्यापारात सतत तूट सहन करणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुदृढतेसाठी ही फार महत्त्वाची गोष्ट घडली आहे. वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी या उद्दिष्टपूर्तीला ‘ब्लॉकबस्टर’ असे नाव दिले असून ते अगदी रास्त म्हटले पाहिजे.

**निर्यातवाढीचे विविध पैलू**

निर्यातीचे उदिष्ट साध्य केले एवढेच महत्त्वाचे नसून त्यातून भारताने ज्या गोष्टी साध्य केल्या, त्याही तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. त्यातील काही अशा-या आर्थिक वर्षात इंजिनिअरिंग वस्तूंची निर्यात तब्बल ५० टक्क्यांनी वाढली आहे. हातमागावरील धागे आणि कापडाची निर्यातही ५० टक्क्यांनी वाढली आहे. सरकारने आखलेल्या आत्मनिर्भर धोरणातून ज्या वस्तूंचे उत्पादन देशात सुरू झाले त्या वस्तूंचा वाटा यात अधिक आहे. उदा. आतापर्यंत मोबाईल फोनची बहुतांश आयात चीनमधून करावी लागत होती, पण आता मोबाईलची निर्यात देश करू लागला आहे. या निर्यातीचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे बासमती शिवायचा साधा तांदूळ, गहू, मसाले, साखर, मासे या शेती उत्पादनांची आतापर्यंतची सर्वाधिक निर्यात या वर्षात नोंदविली गेली. अधिक उत्पादनामुळे भारतीय शेतकऱ्यांना योग्य भाव मिळत नाही, पण तो मिळण्यास या निर्यातीचा हातभार लागला. आतापर्यंत पेट्रोलियम पदार्थ, स्टीलआणि दागिने-हिरे याचा वाटा अधिक होता. त्यात बदल होताना दिसला आहे. या काळात अमेरिका, युनायटेड अरब अमिराती, बांगलादेश आणि नेदरलँड्सशी असलेले द्विपक्षीय करार मजबूत झाले. चीन हा आजही अनेक देशांच्या दृष्टीने सर्वांत मोठा निर्यातदार देश असला तरी कोरोनाच्या काळात त्याच्यावरील जगाचा विश्वास कमी झाल्यामुळे जग पर्यायी देश म्हणून भारताकडे पाहू लागले आहे. आत्मनिर्भर भारत आणि उत्पादन आधारित सवलती, अशा योजनांमुळे ही नवी संधी घेणे सोपे झाले असून त्याचा देशाला दीर्घकालीन फायदा होणार आहे.

**देशाचा वाढला आत्मविश्वास**

निर्यातीच्या निकषाने भारताचा जगात २० वा क्रमांक लागतो, पण या उद्दिष्टपूर्तीतून त्याने युनायटेड अरब अमिराती, स्पेन आणि स्वित्झर्लंडला मागे टाकून पुढील काळात १५व्या क्रमांकावर झेप घेण्याची शक्यता आहे. परकीय चलन, जीडीपीची वाढ आणि रोजगार संधीचा निर्यातीचा जवळचा संबंध आहे. त्याचा थेट परिणाम या सर्व परिमाणांमध्ये दिसू लागला आहे. परकीय चलनाचा साठा आज ६३१ अब्ज डॉलर असणे, इंधनाच्या भडकलेल्या दराच्या पार्श्वभूमीवर रुपया तुलनेने स्थिर असणे, जगातील प्रमुख अर्थव्यवस्थामध्ये सर्वाधिक जीडीपी विकासदर असणे आणि संघटीत क्षेत्रातील रोजगारात वाढ होणे, हे सर्व त्यामुळेच शक्य झाले आहे. (इंधनाची दरवाढ झाल्यामुळे रुपयाचे अधिक अवमूल्यन झाले असते, पण परकीय चलनाचा पुरेसा साठा असल्याने रिझर्व्ह बँकेने डॉलरची विक्री केली आणि रुपयाचे अवमूल्यन रोखले) विशेष म्हणजे छोट्या आणि मध्यम उद्योगांना निर्यातवाढीची मिळालेली संधी ही त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास सहाय्यभूत ठरली. इंजिनिअररिंग वस्तूंची निर्यात ५० टक्के वाढली, याला त्या संदर्भाने महत्त्व आहे. तांत्रिक कौशल्ये असलेले मनुष्यबळ, त्यासाठीचे लागणारे खेळते भांडवल आणि निर्यातवाढीसाठी सरकारने केलेले प्रयत्न, त्यामुळे निर्यातीच्या वाढीची पुढील उद्दिष्ट साध्य करण्याच्या आशा वाढल्या. २०२८पर्यंत हा आकडा एक ट्रिलियन डॉलर व्हावा, असे प्रयत्न सध्या सुरू आहेत. सरकारने पुढील निर्यातवाढीसाठी कोणत्या देशांना काय लागते आणि त्यासाठी देशात कोणत्या भागात कोणत्या उत्पादनांवर विशेष लक्ष द्यावे लागेल यावर लक्ष केंद्रित केले आहे. शिवाय निर्यातवाढीसाठी अडथळा ठरणारे नियम बदलले जात आहेत.

पाकिस्तान, श्रीलंकेसारख्या शेजारी देशात निर्माण झालेला आर्थिक पेचप्रसंग, तेथे प्रचंड वाढलेली महागाई आणि जगातील अनेक देशांत निर्माण होत असलेले आर्थिक अस्थैर्य, याची तुलना करता भारतीय नागरिक, शेतकरी आणि उद्योजकांनी करोनानंतरच्या स्थितीला मोठ्या धीराने तोंड दिले. त्यामुळेच ही महत्त्वाकांक्षी कामगिरी देश करू शकला, असे म्हणता येईल.

***कोरोनामुळे विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था आणि रशिया-युक्रेन युद्धामुळे त्यात पडलेली भर यामुळे जगात आर्थिक अस्थर्य निर्माण झाले आहे. अशा या काळात भारताने निर्यातवाढीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट पूर्ण करणे, याला विशेष महत्व आहे.परकीय चलनाचा विक्रमी साठा, आव्हानात्मक काळातील जीडीपीची वाढ आणि रोजगार संधीत होत असलेली वाढ हे त्याचेच फलित आहे.***

**अर्थ प्रहर**



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)



# खरेदी-विक्रीचे निर्णय घेताना पूर्वग्रहात राहणे आत्मघातकी!

मागील काही महिने बाजार प्रामुख्याने रशिया-युक्रेन युद्ध व त्याचे परिणाम यामुळे दोलायमान राहिलाय. मागील सहा महिने विदेशी गुंतवणूकदारांनी लावलेला विक्रीचा सपाटा थांबवून ते खरेदीचा विचार करताना दिसत आहेत. महागाई आणि व्याजदराचा बागुलबुवा बाजारास दाखवून झालेला दिसतो आणि हे शेअर्सच्या किमतींनी आत्मसात केलंय. साहजिकच अनेक गुंतवणूकदार बाजारात सध्या तळ शोधताना दिसत आहेत. अनेक गुंतवणूकदार बाजारात टायमिंगला जास्तच महत्त्व देताना दिसतात, परंतु या अंदाजपंचे बाबतीत ते नेहमीच स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेत असतात.बाजार खाली पडताना वाट बघत बसणं आणि बाजार वरती असताना उड्या मारून खरेदी करणं, म्हणजे जसं काही पुन्हा हे शेअर्स मिळणारच नाहीत. असो, अगदी अनेक वेळा गुंतवणुकीच्या बाबतीतही अशाच काही प्रवृती आपल्याला आढळून येतात मात्र एक चांगला गुंतवणूकदार होण्यासाठी अशा वृत्ती समजून त्यांवर मात करणं हे नक्कीच यशस्वी गुंतवणूकदाराचं रूप मानलं जातं.

**स्थिरकन पूर्वग्रहाचा परिणाम**

अर्थशास्त्रात दिल्याप्रमाणं स्थिरकन पूर्वग्रह असल्यानं गुंतवणूकदारांसाठी आपली गुंतवणूक एखाद्या अवमूल्यित कंपनीत करणं किंवा उर्ध्व मूल्यातील गुंतवणूक लागलीच काढून घेणं यासारखे चुकीचे आर्थिक निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकते. हा पूर्वग्रह, आर्थिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये खरेदी-विक्रीचा निर्णय आणि वस्तूंच्या किमती यासारख्या मुख्य आकडेवारीपासून रोख प्रवाह आणि सुरक्षेच्या किंमतींसारख्या अंतिम उत्पादनापर्यंत कोणत्याही ठिकाणी उपस्थित राहू शकतो, परंतु एक गुंतवणूकदार म्हणून, आपल्या व्यक्तिमत्त्वाचं वैशिष्ट्य, आपली भावनिक स्थिती आणि मनोवैज्ञानिक जडण यांच्या आधारे आपण गुंतवणुकीचा निर्णय घ्यावयास हवा. यासाठी आधी एका व्यवहारातील उदारणानं ही गोष्ट उमजून घेऊ..

**पहिल्या किमतीचा प्रभाव**

आपण प्रथम एखाद्या ब्रॅण्डचा एक टी-शर्ट ज्याची किंमत १ हजार रु. असल्यास जर दुसऱ्या ब्रॅण्डच्या टी-शर्टची किंमत ७०० रु. असल्यास आपण दुसऱ्या शर्टकडं पाहताना स्वस्त म्हणून पाहतो आणि १००० वाल्याकडं महाग म्हणून आणि आपल्या मनात द्वंद्व सुरू होतं. आपण निर्णय घेऊ शकत नाही, मात्र पुढील वेळेस हाच १००० रुपये ब्रँडवला टी-शर्ट ९०० रुपयांना मिळाला तर आपण झटकन विचार न करता (मागच्या वेळेपेक्षा) स्वस्त आहे म्हणून घेऊन टाकतो आणि यावरच अनेक दुकानदार आपली खरी कमाई करतात. इथं आपण पाहिलेली पहिली किंमत-आपल्या मतावर अयोग्यपणे प्रभाव पाडते. जेव्हा लोक निर्णय घेण्याचा प्रयत्न करीत असतात तेव्हा ते नेहमी संदर्भ किंवा प्रारंभिक बिंदू म्हणून या पूर्वग्रहाचा कळत-नकळत वापर करून त्या भोवती केंद्रवर्ती होऊन जातात.

**रिलायन्सचा शेअर महाग की स्वस्त?**

अगदी हीच गोष्ट आपल्याला एखाद्या शेअरच्या बाबतीत पाहायला मिळते. उदाहरण द्यायचे झाल्यास सर्वांच्याच परिचयाच्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या शेअरचा भाव मागील अनेक वर्षं १००० रुपयांच्या खालीच घुटमळत असायचा. जियो आल्यानंतर नंतर त्याचा भाव पुढील एक वर्षभर १०००-१४०० मध्ये दोलायमान राहिला. आता ज्यांना या शेअरचा भाव १००० रु.च्या खाली पाहायची सवय झाली त्यांनी त्याचा भाव १००० रु.च्या वर गेल्यावर त्यामध्ये गुंतवणूक करण्याचा विचार सोडून दिला. सध्या हा शेअर बाजाराच्या दिशेशी फारकत घेऊन आपल्या २७५१ या उच्चांकाकडं मार्गक्रमण करताना दिसत आहे. मागील वर्षी एप्रिल महिन्यात तेच गुंतवणूकदार त्याच्या २३६९ या उच्चांकानंतर आता १८००-१९०० रुपयांवर म्हणजे स्वस्त झाला म्हणून खरेदी करण्याऐवजी तो पंधराशे रुपयांत घेण्यासाठी वाट पाहत होते आणि आता मात्र अचानक त्यांच्यातील व्हॅल्यू इन्व्हेस्टर जागा होऊन त्यातील मूल्य तपासू लागलेत आणि दीर्घ मुदतीसाठी अगदी या २६०० रुपयांवर देखील हा शेअर त्यांना महाग वाटत नाहीये. या द्विधा परिस्थितीचं कारण म्हणजे आपण आपल्याच मनात केलेले आडाखे-८००चा शेअरभाव १००० झाल्यास तो महाग आणि २३०० वरून १८००वर आला की तो स्वस्त. अगदी याच्या उलट परिस्थिती म्हणजे ‘गमावल्याची भावना’. अगदी वरील उदाहरणच पाहायचे झाल्यास ज्यांनी रिलायन्सचे शेअर्स १८०० रुपयांना, नंतर अगदी अलीकडं २२०० रुपयांना खरेदी केले नाहीत त्यांना जसजसा त्याचा भाव आता २६०० पुढं जाऊ लागला तेव्हा अनेक साक्षात्कार झाले की कसं रिलायन्स ग्रीन एनर्जीमध्ये आपले हातपाय पसरू शकतो आणि जोडीला ’जियो’ व रिलायन्स रिटेलचं अफाट मूल्य आहेच.. आणि या सगळ्याची गोळा-बेरीज म्हणजे याचा भाव ४०००-५००० होणार अशी भावना होऊन मग अनेकवेळा अशा परिस्थितीत आपण आजूबाजूला पाहतो, तर समजतं की अनेकांनी यामध्ये आधीच गुंतवणूक केलेली आहे.. मग १८०० रुपयांवर महाग वाटणाऱ्या शेअरची २६००-२७०० रुपयांवरून उड्या मारून खरेदी केली जाते. यालाच म्हणतात की असा शेअर आपल्या पोर्टफोलिओमध्ये नसल्याची खंत वाटून चढ्या भावात केलेली खरेदी म्हणजेच फोमो-फिअर ऑफ मिसिंग आऊट. गमावलेल्या संधीच्या चुकीच्या धारणेनंतर या परिस्थितीचा सामना केला जातो.

**शेअर बाजाराचा पुरेसा अनुभव नसलेले गुंतवणूकदार अनेकदा पूर्वग्रहात अडकून स्वत:चे नुकसान करून घेत असतात. वास्तविक त्या कंपनीचे मूल्य वाढते आहे की कमी होते आहे ही गोष्ट सर्वाधिक महत्वाची असते, पण त्याकडे दुर्लक्ष करून गुंतवणुकीचे निर्णय घेणे हे आत्मघातकी ठरते.**



**वाढ आणि घट होण्याची कारणे**

अगदी यानंतरचा अनुभव म्हणजे, एखाद्या शेअरचा भाव मागील दोन-तीन महिन्यांत २०-३०% पर्यंत कमी झाल्यामुळं या शेअरची लागलीच खरेदी केली जाते. इथं गुंतवणूकदार ठराविक काळातील घट तपासण्यासाठी मागील ५२ आठवड्यांतील किमतीच्या गृहीतकांनुसार त्याचं मूल्यमापन करत असतो, ना की त्या कंपनीमध्ये असलेल्या अधिमूल्याप्रमाणं. प्रत्यक्षात शेअरभावात वाढ व घसरण होण्याची अनेक कारणं असू शकतात हे प्रत्येक गुंतवणूकदारानं लक्षात घेतलं पाहिजे. यानंतरची बाब म्हणजे, जर एखाद्या गुंतवणूकदाराने तीन-पाच वर्षांच्या भावी मूल्यांकनासह एखादा शेअर १०० रुपयांवर खरेदी केला असेल आणि अभ्यासापोटी त्याचं भावउद्दिष्ट हे जर रु. २०० असेल, तर सहाच महिन्यांमध्ये त्या शेअरच्या भावानं २०-२५% परतावा दिल्यास तूर्त त्यामध्ये विक्री करण्यास पुष्टी दिली जाते. (‘आत्ता तर नफा पदरात पाडून घेऊ, पुढचं पुढं पाहू’ , असं समजून.. आणि अशानं तो शेअर पुन्हा खाली आल्यास त्याकडं दुर्लक्ष केलं जातं की, यामध्ये एकदा नफा मिळालाय आणि आता तो पुन्हा खरंच वरती जाईल का? ही शंका स्वतःच उत्पन्न करवून घेऊन.) अशा प्रकारे गुंतवणुकीमध्ये गृहीतकं करण्याच्या हेतूनं कोणतेही स्पष्ट सूत्र उपलब्ध नसलं तरी स्वअभ्यास, जागरूकता या मूल्यांकन संरक्षणासंबंधीत पहिली ओळ म्हणून काम करू शकतात. शेअरभावाचा मागील कल, त्याच्या खरेदी किमतीपासून स्वतःस अलिप्त ठेवून त्याऐवजी मूलभूत गोष्टींवर कंपनीच्या उचित मूल्यावर लक्ष केंद्रित करणं महत्त्वाचं आहे.



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

## अर्थसाक्षर स्पर्धा : १३

**निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रश्न क्र. १. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९ पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
**ड.)** १० कोटी

**प्रश्न क्र. २. भारतीय पासपोर्टधारक जगातील किती देशांना आता व्हिसाशिवाय भेट देऊ शकतात?**
**अ.)** ५९ देश

**प्रश्न क्र. ३. आधार कार्डधारक नागरिकांची संख्या सध्या (फेब्रुवारी २०२२) किती आहे?**
**क.)** १३२ कोटी

**अर्थसाक्षर स्पर्धा १३च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा १३साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतातील सर्व विमान कंपन्यांकडे सध्या किती विमाने आहेत?**
*अ.)* १०१० *आ.)* ७१० *इ.)* ५१० *ई.)* ३१०

**२. रिझर्व बँक ऑफ इंडियाने अलीकडेचबंगळूर येथे रिझर्व बँक इनोवेशन हबची स्थापना कोणत्या उद्देश्याने केली आहे?**
*अ.)* डिजिटल व्यवहार वाढण्यासाठी *आ.)* बँकेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी
*इ.)* आर्थिक सेवा आणि उत्पादने गरीबांपर्यंत पोचण्यासाठी *ई.)* क्रेडीट कार्डचा वापर वाढण्यासाठी

**३. भारताचा हा शेजारी देश सध्या अतिशय गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे.**
*अ.)* बांगलादेश *आ.)* नेपाळ *इ.)* भूतान *ई.)* श्रीलंका




**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# उद्धव ठाकरेंचे सरकार माफिया सरकार

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा आरोप ■ माणगावमध्ये कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत

**माणगाव : प्रतिनिधी**

कोविड काळात दापोलीमध्ये बेकायदा रिसॉर्ट बांधणाऱ्या मंत्र्याची राज्याचे मुख्यमंत्री बाजू घेत आहेत. याला काय म्हणावे, असा सवाल उपस्थित करून भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शनिवारी (दि. २६) माणगावात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली. उद्धव ठाकरेंचे हे सरकार माफिया सरकार असल्याचा गंभीर आरोप त्यांनी या वेळी केला.




(छाया : सलीम शेख)

राज्याचे परिवहनमंत्री व शिवसेना नेते अनिल परब यांच्या रिसॉर्टची पाहणी करण्यासाठी दापोली येथे निघालेले भाजप नेते किरीट सोमय्या यांचे शनिवारी दुपारी माणगाव बसस्थानकाजवळ भाजपतर्फे फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत करण्यात आले. या वेळी 'किरीट सोमय्या आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा जोरदार घोषणाही देण्यात आल्या. त्या वेळी सोमय्या बोलत होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे सरकार भ्रष्टाचारी आहे. यातील अनेक मंत्र्यांवर गैरव्यवहाराचे आरोप आहेत. ते कोविड काळातही कमाई केल्याशिवाय राहात नव्हते. त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांचे व्यावसायिक मित्र सुजित पाटकर यांनी तर कोविड केअर सेंटरचे कॉन्ट्रॅक्ट घेतले. ज्या माणसाची कंपनी अस्तित्वात नाही, ज्यांच्याकडे कंपाउंडर नाही त्यांना पाच कोविड सेंटर देण्यात आली. १०० कोटींचे कॉन्ट्रॅक्ट दिले आणि ३८ कोटींचे कॅश पेमेंटही केले. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे हे सरकार माफिया नाही म्हणायचे तर काय म्हणायचे, अशी टीका सोमय्या यांनी केली.

या वेळी भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, माणगाव तालुका अध्यक्ष संजयआप्पा ढवळे, तालुका समन्वय समितीचे माजी अध्यक्ष नाना महाले, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष शर्मिला सत्वे, यशोधरा गोडबोले, हेमा मानकर, अश्विनी महाडिक, शिला सोनार, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग, चिन्मय मोने, तालुका अध्यक्ष विशाल गलांडे, अरुण पेणकर, संजय जाधव यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी फटाक्यांच्या आतषबाजीत किरीट सोमय्या यांचे स्वागत केले.

# मुरूडमधील रस्ते चांगले होण्यासाठी भाजप जागता पहारा देणार -आण्णा कंधारे

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. हे काम मजबूत व टिकाऊ व्हावे, यासाठी भाजप कार्यकर्ते जागता पहारा देणार असल्याची माहिती भाजपचे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी दिली.



(छाया : संजय करडे)

मुरूड शहरातील रस्त्यांसाठी नगरविकास खात्याकडून नगर परिषदेला पाच कोटी रुपये रक्कम प्राप्त झाले आहेत. त्यामुळे लवकरच शहरातील रस्त्यांच्या कामाला सुरुवात होणार आहे. या पार्श्वभूमीवर आण्णा कंधारे प्रसारमाध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट केली. भाजपचे तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, उपाध्यक्ष परेश किल्लेकर, बाळा भगत, शहर अध्यक्ष उमेश माळी, शेगवाडा अध्यक्ष सुधीर पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

मुरूड नगर परिषदेने सन २०१९ ते २१ या तीन वर्षात रस्त्यांच्या कामासाठी एक कोटी ५३ लाख १४ हजार ९५२ रुपये खर्च केले आहेत. तर रस्ते दुरुस्तीसाठी ३० लाख १० हजार ९३८ रुपये खर्च झाले आहेत. मात्र दोन वर्षापूर्वी तयार केलेले ना रस्ते टिकले, ना दुरुस्तीचा भाग. त्यामुळे जनतेचा पैसा वाया गेला असल्याचे कंधारे यांनी यावेळी सांगितले.

दोन वर्षापूर्वी ज्या ठेकेदाराने रस्त्यांची कामे केली, त्यांना नगर परिषदेने पुन्हा काम देता कामा नये. आता होणारे रस्ते मजबूत व जास्त वर्ष टिकणारे असावेत, रस्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी नगर परिषदेचा इंजिनियर उपस्थित असला पाहिजे, रात्रीच्या वेळी कोणतेही काम खपवून घेतले जाणार नाही, रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी जलवाहिन्या टाकण्याची कामे करावीत, असे स्पष्ट करून, 'ठेकेदाराने अंदाजपत्रकाप्रमाणे काम न केल्यास भाजप मोठे जनआंदोलन करेल', असा इशारा भाजपचे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी यावेळी दिला.

# माणगाव बाजारपेठेत स्वच्छता मोहीम; व्यापारी असोसिएशनने राबविले अभियान

**माणगाव : प्रतिनिधी**

स्वच्छ माणगाव, सुंदर माणगाव संकल्पना नजरेसमोर ठेवून येथील व्यापारी असोसिएशनतर्फे शुक्रवारी (दि. २५) सकाळी माणगाव शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या वेळी प्रामुख्याने बाजारपेठेतील रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली.

माणगाव व्यापारी असोसिएशन तर्फे शुक्रवारी सकाळी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी नगराध्यक्ष आनंद यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन एसटी बस स्थानकापासून स्वच्छता अभियानास सुरूवात करण्यात आली.






नगरपंचायतीच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमते माणगाव बाजारपेठेतील मुंबई-गोवा महामार्गाच्या दुतर्फा असलेला कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत व्यापारी असोसिएशनचे संस्थापक लक्ष्मण दळवी, अध्यक्ष गिरीश वडके, सचिन शरद देसाई, रमेश जैन, अरुण क्षीरसागर, प्रसाद धारिया, ललित ओसवाल, विक्रांत गांधी, अशोक धारिया, जयवंत शेट, संतोष मेथा, संतोष दोशी, निलेश मेथा, मांगिलाल कुमावत, संदीप मेथा, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, स्वच्छता सभापती अजित तारलेकर, महिला व बालकल्याण समिती सभापती शर्मिला सुर्वे यांच्यासह व्यापारी, नगरपंचायतीचे स्वच्छता कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते.

# कर्जत रेल्वेस्थानकातील पादचारी पुलाच्या गर्डरचा अडथळा दूर



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

मध्य रेल्वेच्या कर्जत स्थानकातील फलाट दोनवरील पादचारी पुलाचा गर्डर टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे लवकरच पूर्ण होऊन हा पादचारी पूल प्रवाशांसाठी खुला होणार आहे.

कर्जत रेल्वेस्थानकात फलाट दोनवर आठ वर्षांपूर्वी पादचारी पूल बांधण्यात आला होता, मात्र तो पुणे एन्डकडे असल्याने कर्जत स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी त्याला विरोध दर्शविला होता. त्यानंतर तब्बल दोन वर्षांनी लोकलच्या बाजूने पादचारी पूल बनविण्यात आला आणि नंतर आठ वर्षांपूर्वी उभारलेल्या जुन्या पादचारी पूलाचा जिना तोडण्यात आला. तरीदेखील फलाट दोनवरून फलाट क्रमांक तीनच्या बाहेर पडण्यासाठी पादचारी पूल उभारण्यात येणार होता. मात्र या नियोजित पादचारी पुलाचे काम गेल्या चार वर्षापासून थांबले होते. या पुलाचे गर्डर टाकण्याचे काम आता पूर्ण झाले असून, सध्या या पुलाच्या दोन्ही बाजू जोडण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर हा पादचारी पूल प्रवाशांसाठी खुला करण्यात येणार आहे.

# मुरूडमध्ये ३४३ आदिवासी बालकांना पोषण पोटल्यांचे वाटप



**मुरूड : प्रतिनिधी**

एकात्मिक बालविकास सेवा अंतर्गत अन्नदा-पोषण आणि विकास कृती संघटनेतर्फे व स्वामीराज फाउंडेशनच्या माध्यमातून मुरूड तालुक्यातील विविध अंगणवाडी केंद्रातील सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील कुपोषित आदिवासी बालकांना पाच किलोच्या ३४३ पोषण पोटल्यांचे वाटप करण्यात आले.

मुरूड पंचायत समितीच्या कै. नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात झालेल्या या कार्याक्रमाला तहसीलदार रोहन शिंदे, नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, गटविकास अधिकारी सुभाष वाणी, विस्तार अधिकारी संजय शेडगे, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रविण पाटील, अन्नदा-पोषण आणि विकास कृती संघटनेचे दिपेश गावडे, स्वामीराज फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश माने, संजीवनी माने, सुप्रिया पाशीलकर, कविता कदम, शुभांगी कोतवाल, सुवर्णा चांदोरकर, राजू म्हशीलकर यांच्यासह सर्व आंगणवाडी सेविका व आदिवासी महिला उपस्थित होत्या. तहसीलदार रोहन शिंदे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले.

# पेण करंजटेप हद्दीत झायलो गाडी पलटी

## एक ठार, एक जखमी

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावर करंजटेप गावाच्या हद्दीत शनिवारी (दि. २६) सकाळी चालकाचे नियंत्रण सुटल्याने झायलो गाडी पलटी झाली. या अपघातात गाडीतील एक ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला.

फिर्यादी शरीफ मुनाफ बागवान (वय ४५, रा. खांदाड गाव, ता. माणगाव) हे त्यांच्या कुटुंबियांसह शनिवारी सकाळी झायलो (एमएच-०६,एझेड-४५४७) गाडीमधून पेण येथे नातेवाईकाच्या अंत्यविधीसाठी येत होते. मुंबई-गोवा महामार्गावर करंजटेप गावच्या हद्दीत चालक याकुब इसा बागवान (वय ४७, रा. खांदाड, ता. माणगाव) यांचे नियंत्रण सुटून गाडी डिव्हायडरला धडकली व रस्त्याच्या उजवीकडे खालच्या बाजूस पलटी झाली. या अपघातात गाडीतील मुनाफ सांडू बागवान (वय ७५) मृत्यू पावले. तर शरीफ बागवान जखमी झाले. तसेच गाडीतील महिलांनाही किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांना पेण उपजिल्हा रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले. या अपघाताची नोंद वडखळ पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# कर्जतमध्ये साजरा झाला जागतिक कविता दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे जागतिक कविता दिन साजरा करण्यात आला. या वेळी ज्येष्ठ नागरिकांनी कविता, पोवाडे सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

संस्थेचे सभासद दिलीप गडकरी यांनी केलेल्या सूचनेनुसार संस्थेने कर्जत येथे कवी संमेलन आयोजित केले होते. कर्जत शहरांत जागतिक कविता दिन पहिल्यांदा साजरा झाला. त्यात बळीराम दिघे, रघुनाथ ढाकवळ, नंदकिशोर भोंडे, केतन गडकरी, अरुण मोकल, प्रकाश नगरकर, गणेश पावसकर, शिवाजी श्रीखंडे, विरेश्वर जोशी, चंद्रकांत साळवे, अशोक थोरवे, प्राजक्ता गरवारे, कृष्णा लाड, अच्युत कोडगीरे, रश्मी गांगल, विजयकुमार गोखले, सुभाषचंद्र नातू, दिलीप गडकरी यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. केतन गडकरी, विजयकुमार गोखले, रश्मी गांगल, प्राजक्ता गरवारे, सुभाष नातू यांच्या कवितांना रसिकांकडून विशेष दाद मिळाली.

प्राजक्ता गरवारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला ज्येष्ठ कवी विजयकुमार गोखले, दिलीप गडकरी व ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे यांचा सन्मान करण्यात आला.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

# तैवान येथे पीएचडीकरिता जाणाऱ्या विद्यार्थ्याला 'सक्षम'चा मदतीचा हात

**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील किहीम गावातील वैभव तांबट या प्रतिभावान मुलाने पीएचडी करण्याचा निर्णय घेतला. त्याकरीता तैवान येथील युनिव्हर्सिटीमध्ये त्यांची निवडदेखील झाली. सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून प्रोत्साहनपर मदत म्हणून वैभव तांबट यांना राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते ५० हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.



वैभव तांबट यांनी अवघ्या दिड वर्षांचा असताना वडील गमावले व १४ वर्षाचा असताना आईला गमावले. पुढे किहीम येथे मामा मिलींद समेळ यांच्याकडे राहून त्यांनी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने १२वीपर्यंत शिक्षण घेतले. नंतर पनवेल येथे सीकेटी कॉलेजमधून पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण करून जळगाव येथे पदव्युत्तर शिक्षण घेतले. आर्थिक अडचणींसोबतच तैवान येथे पीएचडी करत असताना स्टायपेंड मिळेल परंतु प्रवास खर्च आहे, कोरोनाबाबत नियमावलीचे पालन करताना राहण्याची व अन्य व्यवस्था खर्चिक असल्याने आर्थिक ताळमेळ बसणे कठीण असल्याचे वैभवने सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या सदस्यांची भेट घेत अडचण मांडली. सक्षमचे मार्गदर्शक प्रशांत मोरजकर यांच्या आर्थिक मदतीतून कै. डॉ. अर्जुन मोरजकर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत या गुणी विद्यार्थ्याला ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली.

सक्षम एज्युकेशन सोसायटी तर्फे शार्दूल काठे, प्रतिम सुतार, योगेश पवार, गणेश भोईर, विशाल आमले, छाया म्हात्रे, प्रतीक म्हात्रे, अनिकेत नाईक, मिलींद समेळ आदी सदस्य या वेळी उपस्थित होते. शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या विद्यार्थ्याला सहकार्य करता आल्याची भावना उपस्थित सदस्यांनी व्यक्त केली. सक्षम एज्युकेशन सोसायटीच्या आवाहनाला प्रतिसाद देत आर्थिक पाठबळ उभ्या करणाऱ्या प्रत्येक दात्याचे या वेळी आभार मानण्यात आले. सदर कार्याची दखल घेत समाजातील अनेकांनी वैभव तांबट यांना शैक्षणिक कार्यासाठी मदतीचा ओघ सुरू केला आहे.

Rayat Shikshan Sanstha's,
**Loknete Ramsheth Thakur English Medium School & Jr. College**
**Self-Finance**
Sector-6A, Plot No.40, Kamothe. Tal- Panvel. Pin No. 410 209
Ph. No. 022-27431232 Email Id :- kamotheemsrr@gmail.com

**REQUIREMENT 2022-2023**
**INVITES APPLICATION FOR THE FOLLOWING POSTS**

| Sr. No. | Name of the Post | No.of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Supervisor | 3 | B.A. B.Ed / B.Sc. B.Ed / B. Com B.Ed / M.A. B.Ed. / M. Sc. B.Ed / M. Com B.Ed (5 years experience in School) |
| 2 | Pre-Primary (Nursery to Sr.KG) | 10 | H.S.C / B.A. / B.Sc. / B.Com. And Montessori / E.C.C.Ed. / P.T.C. |
| 3 | Teachers (Std - 1st to 5th) | 25 | D.Ed. / B.A.B.Ed. / B.Sc.B.Ed. / B.Com.B.Ed. |
| 4 | Teachers (Std - 6th to 10th) | 22 | B.A. B.Ed / B.Sc. B.Ed. / B.Com B.Ed / M.A. B.Ed / M.Sc. B.Ed. / M.Com.B.Ed. |
| 5 | Teachers (Std - 11th to 12th) | 10 | M.A.B.Ed. / M.Sc.B.Ed. / M.Com.B.Ed. |
| 6 | Sport Teachers/P.E.Teachers | 3 | B.A.B.P.Ed. / B.Sc.B.P.Ed. / B.Com.B.P.Ed. |
| 7 | Art & Craft Teachers | 2 | ATD / BFA / GD / AM |
| 8 | Computer Teachers | 3 | B.Sc.(IT/CS) / M.Sc.(IT/CS) / BCA / MCA |
| 9 | Music Teachers | 2 | Music Visharad |
| | Total | 80 | |

**Subject Wise Requirement :-**
**For Secondary Section :-**
English, Marathi,Hindi, Maths, Social Science, Science
**For Higher Secondary Section :-**
English, Marathi, Hindi, Economic, Organisation of Commerce, Book Keeping, Biology, Chemistry, Maths, Physics

**Instruction**
1) Candidates having excellent subject knowledge and D.Ed./ B.Ed. Degree From a Recognised University only need to apply.
2) Application forms are to be taken from the school office from **28/03/2022 to 07/04/2022 Time 10.00 am. To 5.00 pm.** Application form fee: Rs.100/
3) Last day to submit your C.V., duly filled application form along with attested copy of your documents and cover letter in the office is **09/04/2022 Time 10.00 am. To 5.00 pm** excluding holidays. Originals will be verified at the time of interview
4) Candidates who are sending their application through e-mail on kamotheemsrr@gmail.com should submit the application form / fees with in the given dates.
5) Decision of the selection committee would be final.

**Secretary**
Rayat Shikshan Sanstha, Satara

**TENDER NOTICE**

**JBSP SANSTHA, PANVEL** invites sealed tenders in 2 envelope system from reputed experience contractors for the work mentioned below.

1. **Name of The work :** Plumbing work of School building at PLOT No. 1, SEC. 12, ULWE, NAVI MUMBAI, on with material basis (Toilet fittings will be provided by client)
2. **Estimate cost :** Approximately Rs 1,00,00,000/- (with material and labour charges)
3. **EMD :** Rs.1,00,000/- by DD of Nationalized or Schedule bank in favor of **JBSP Sanstha, New Panvel**
4. **Cost of blank tender :** Rs.3000+18%GST
5. **Criteria for eligibility of contractor :**
   1) The average turnover of the contractor for the last three years should not be less than Rs. 3 Crore.
   2) The contractor should have completed 2 Government jobs of similar work of not less than Rs. 75 Lakhs each in last three financial years OR 1 Government job of similar work of not less than Rs. 1 Crore in last three financial years OR 2 Private jobs of similar work of not less than Rs. 1.50 Crores each in last three financial years OR 1 Private job of similar work of not less than Rs. 2 Crores in last three financial years.
6. **Place of sale of tender : JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S Office,C.K.T. PLOT NO-8 SECTOR-14, Janardan Atmaram Bhagat Marg, Cidco Colony, NEW PANVEL.** Tel : 022 - 27462579 from 04/04/2022 to 09/04/2022, from 11 AM to 5.30 PM, excluding holidays
7. **Pre bid meeting :** 11/04/2022 at 4.00 PM at above address
8. **Date of Submission of Tender :** On or before 19/04/2022 up to 2.00 pm at above address.
9. **Date of Opening of Tender :** 19/04/2022 - 4.00pm at same place.
10. **Completion Period :** 18 Months Including Monsoon

ARCHITECT NARENDRA VALANJ | ARCHITECT DHUMAL AND ASSOCIATES
MEP CONSULTANT UMESH THAMKE | OWNER/LEASEE JBSPSANSTHA

आयपीएलचा रनसंग्राम
आजचे सामने
दिल्ली वि. मुंबई (३.३० वा., मुंबई)
पंजाब वि. बंगळुरू (७.३० वा., नवी मुंबई)

# पुढील वर्षीपासून महिलांचीही आयपीएल

## ■ यंदा चार प्रदर्शनीय सामने; बीसीसीआयची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) पुढील वर्षीपासून महिलांच्या इंडियन प्रीमियर लीगचा (आयपीएल) प्रारंभ करण्याची योजना आहे, असे अध्यक्ष सौरव गांगुली यांनी सांगितले. याचप्रमाणे एक वर्षाच्या विश्रांतीनंतर यंदा महिलांचे चार प्रदर्शनीय सामने होणार आहेत.



महिलांचे आयपीएल सुरू करण्यात दिरंगाई केल्यामुळे टीका होत असलेल्या बीसीसीआयला आता वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी लागणार आहे, अशी माहिती आयपीएल प्रशासकीय समितीच्या बैठकीनंतर गांगुली यांनी दिली.

पुरुषांच्या आयपीएलचे साखळी सामने सुरू असताना तीन महिला संघांमध्ये चार प्रदर्शनीय सामने खेळवण्यात येणार आहेत. पहिल्या हंगामात पाच ते सहा संघांचा समावेश असू शकेल, परंतु यासाठीसुद्धा सर्वसाधारण सभेची मंजुरी लागेल, असे आयपीएल प्रशासकीय समितीचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी सांगितले. प्रदर्शनीय सामने पुण्याच्या महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर होण्याची शक्यता आहे.

सन २०२३ ते २०२७ या कालावधीसाठी आयपीएलच्या प्रसारण हक्काची निविदा लवकरच जारी करण्यात येणार आहे. या संदर्भात प्रशासकीय समितीच्या सभेत चर्चा झाली. २०१८ ते २०२२ या चार वर्षांसाठी स्टार इंडियाने १६,३४७.५ कोटी रुपये रकमेला हे हक्क प्राप्त केले होते, परंतु लीगची लोकप्रियता आणि दोन वाढीव संघांमुळे पुढील पाच वर्षांसाठी हे प्रसारण हक्क ४० हजार कोटी रुपये रकमेपर्यंत जाण्याची शक्यता येत आहे.



# स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सिंधू, प्रणॉय उपांत्य फेरीत

**बसेल (स्वित्झर्लंड) : वृत्तसंस्था**

दुहेरी ऑलिम्पक पदकविजेती पी. व्ही. सिंधू आणि एच. एस. प्रणॉय यांनी सहज विजयांसह स्विस खुल्या बॅडमिटन स्पर्धेच्या अनुक्रमे महिला आणि पुरुष एकेरी गटाची उपांत्य फेरी गाठली.

द्वितीय मानांकित सिंधूने कॅनडाच्या पाचव्या मानांकित मिशेले ली हिचा ३६ मिनिटांत २१-१०, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव केला, तर माजी राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेत्या प्रणॉयने पारुपल्ली कश्यपला २१-१६, २१-१६ असे ४३ मिनिटांत नामोहरम केले.

जागतिक क्रमवारीत २३ व्या क्रमांकावरील सायनाने मात्र क्रमवारीत ६४ व्या क्रमांकावरील किसोनाकडून २१-१७, १३-२१, १३-२१ अशी हार पत्करली. महिला दुहेरीत एन. सिक्की रेड्डी आणि अश्विनी पोनप्पाचे आव्हानही संपुष्टात आले.

# पेण संघ कमळ चषकाचा मानकरी

**उरण : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष नवीन शेवा आयोजित आणि ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि. (टीआयपीएल) पुरस्कृत लेदर क्रिकेट टी-२० स्पर्धेत पेणच्या मुंडे स्पोर्ट्स संघाने विजेतेपदाचा कमळ चषक पटकाविला. गव्हाणचा बाप्पा मोरया संघ उपविजेता ठरला.





उरण तालुक्यातील नवीन शेवा येथे झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभाला भाजप ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घरत, भाजप तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, सरचिटणीस दीपक भोईर, नवीन शेवा अध्यक्ष मयूर म्हात्रे, युवा नेते गणेश घरत, परेश घरत, भगवान घरत, नितेश घरत, विवेक म्हात्रे, समीर पाटील, मनोज ठाकूर, हेमंत ठाकूर, अजय घरत, स्वप्नील घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

सलग १० दिवस खेळल्या गेलेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील १६ संघांनी सहभाग घेतला होता.

अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पेण संघाने २० षटकांत तीन बाद २०३ धावा केल्या होत्या. गव्हाण संघाचा डाव १९.४ षटकांत १४५ धावांमध्ये संपुष्टात आला.

स्पर्धेतील मालिकावीर म्हणून रोहन कोळी (गव्हाण, १०५ धावा आणि सात विकेट) अंतिम लढतीतील सामनावीर व उत्कृष्ट फलंदाज आरमान शेख (पेण, १२२ धावा), उत्कृष्ट गोलंदाज अजिंक्य रसाळ (पेण, १३ विकेट) यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या संघांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शांतेश्वरी क्रिकेट संघाचे तसेच सल्लागार चंद्रकांत म्हात्रे, मनोजकुमार म्हात्रे, अध्यक्ष गणेश घरत, उपाध्यक्ष अजय घरत, कर्णधार निषिकेत भोईर, उपकर्णधार अभिषेक म्हात्रे यांचे सहकार्य लाभले.

# ‘सॅफ’ फुटबॉल स्पर्धेत भारतीय संघाला विजेतेपद

**जमशेदपूर : वृत्तसंस्था**

भारताने अखेरच्या साखळी लढतीत बांगलादेशकडून ०-१ अशी हार पत्करली, परंतु तरीही सरस गोलफरकाच्या आधारे कुमारी ‘सॅफ’ फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

भारताने (११) बांगलादेश (३) संघापेक्षा सरस गोलफरक राखला. या स्पर्धेतील सर्वाधिक गोल नोंदवणाऱ्या खेळाडूंचा आणि सर्वात मौल्यवान खेळाडूचा पुरस्कार लिंडा कोमने पटकावला. तिने एकूण पाच गोल झळकावले.




या सामन्यात पाचव्या मिनिटाला शुभांगीने गोल करण्याचा केलेला प्रयत्न बांगलादेशची गोलरक्षक रूपनाने हाणून पाडला. मग ४० व्या मिनिटाला नितूने केलेला प्रयत्नही रुपनाच्या कौशल्यामुळे अपयशी ठरला.

दुसऱ्या सत्रात भारताचे मुख्य प्रशिक्षक थॉमस डेनर्बी यांनी शुभांगीच्या जागी पूनमला मैदानावर आणले. ६० व्या मिनिटाला भारताची कर्णधार शिल्की देवीने लांबवरून गोल साकारण्याचा केलेला प्रयत्नही अयशस्वी ठरला. मार्टिना आणि सुनीता यांच्या जागी निकीता आणि अमिशा यांना बदली करण्यात आले. बांगलादेशने मग आक्रमणाची धार वाढवली. सामन्याच्या ७४ व्या मिनिटाला प्रियांकाने साकारलेला गोल हा बांगलादेशसाठी निर्णायक ठरला.

# राष्ट्रीय वॉटरपोलो स्पर्धेत वेस्टर्न रेल्वे संघ चॅम्पियन




**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय पातळीवरील आंतररेल्वे वॉटरपोलो चॅम्पियनशिपमध्ये वेस्टर्न रेल्वे संघाने विजेतेपद पटकाविले. ही स्पर्धा २२ ते २६ मार्च दरम्यान कोलकाता येथे झाली.

वेस्टर्न रेल्वे संघाने साऊथ वेस्टर्न रेल्वे संघाचा १७-७, साऊथर्न रेल्वेचा २१-६, इस्टर्न रेल्वेचा १३-७, सेंट्रल रेल्वेचा १५-७ आणि साऊथ इस्टर्न रेल्वेचा १२-६ असा पराभव करून विजेतेपदावर आपले नाव कोरले.

विजेत्या वेस्टर्न रेल्वे संघात मंदार भोईर, अश्विनीकुमार कुंडे, श्रेयस वैद्य, अर्जुन कवळे, सुमित गव्हाणे, प्रतिक अजमिरे, आशिष अंबालकर, अक्षयकुमार कुंडे, विनिश आर, तेजस पाठारे, सारंग वैद्य, भूषण पाटील, सौरभ ढेरे या खेळाडूंचा समावेश होता. त्यांना प्रशिक्षक अरुण मिश्रा, संकेत शिंदे, प्रभात अग्रवाल व अक्षय कुऱ्हेकर, वरिष्ठ क्रीडा अधिकारी सॅबेस्टियन झेव्हियर यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# आयपीएल २०२२ नंतर धोनी निवृत्त होणार?

**चेन्नई : वृत्तसंस्था**



चेन्नई सुपर किंग्जला चार वेळा जेतेपद मिळवून देणारा कॅप्टन माही अर्थात महेंद्रसिंह धोनीने अचानकपणे चेन्नईचे कर्णधारपद सोडले. धोनीने चेन्नई संघाचे कर्णधारपद रवींद्र जडेजाकडे सोपवले असून अवघ्या दोन दिवसांवर सामना आलेला असताना त्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. दरम्यान, चेन्नईचे मुख्य कार्यकारी अधिकारी काशी विश्वनाथ यांनी धोनीच्या संन्यासाबाबत विधान केले आहे.

आयपीएलच्या पंधराव्या हंगामात धोनी चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून यष्टीरक्षक आणि फलंदाज म्हणून खेळणार असून त्याच्याकडे कर्णधारपद नसेल. कर्णधारपदाचा अचानकपणे त्याग केल्यामुळे आता आयपीएलचा हा हंगाम धोनीचा शेवटचा हंगाम असेल असे अनेकजण म्हणत आहेत, मात्र धोनीने याबाबत अजूनतरी कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही.

धोनीचा संन्यास तसेच त्याने केलेला कर्णधारपदाचा त्याग याविषयी चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य कार्यकारी अधिकारी काशी विश्वनाथ म्हणाले की, धोनीने घेतलेल्या निर्णयावर माझा विश्वास आहे. धोनी मार्गदर्शक म्हणून संघासोबत कायम असेल. तसेच धोनीचा हा शेवटचा हंगाम नसेल, असे मला वाटते, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

धोनी जोपर्यंत तंदुरुस्त आहे तोपर्यंत तो पुढे जात राहिल, मात्र धोनी काय विचार करतो याबाबत मला माहिती नाही. आम्ही धोनीच्या निर्णयाचा नेहमीच आदर केलेला आहे. तो आमच्यासाठी शक्तीस्तंभ असून त्याचे हे स्थान कायम राहिल, असेदेखील विश्वनाथन म्हणाले.



पनवेल : भाजपचे युवा कार्यकर्ते क्रांतिश्याम गाताडे यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सतीश म्हस्कर, युवा मोर्चा अध्यक्ष ओमकार माळी, आंबो ढवळे उपस्थित होते.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com